# प्रशासकीय मान्यता आदेश

जाक्र.बाकवि/अं.वाडी/जिवायो/सीआर-३९/कावि- ८५५ /२०१८
महिला व बाल विकास विभाग,जिल्हा परिषद,लातूर
दिनांक :- २९ / १२ -/२०१८

## ज्ञापन

**विषय :-** अंगणवाडी इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देणे बाबत .
लेखाशिर्ष - २२३६१३४६

**संदर्भ :-**
१) शासन निर्णय,ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग मंत्रालय,मुंबई क्र.झीडपी२००८/ /प्र.क्र.४४४/वित्त-९ दि.१५ जूलै २००८
२) नियोजन विभाग शा.नि.क्र.जिवायो-१००७/प्र.क्र.३९/का.१४४४,दि.१६ फेब्रुवारी,२००८
३) महाराष्ट्र जि.प. व पं.स. लेखा संहिता १९६८ चे परीशिष्ट २
४) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग,क्र एबावि-२००८/प्रक्र-१७३/का-६ दि.१५ जानेवारी २०१०
५) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग,क्र एबावि-२००८/प्रक्र-१७३/(भाग-१)का-६ दि.२०.४.२०११
६) शासन निर्णय क्र एबावि-२०१७/प्र.क्र.१०१/का.६ दिनांकः १५ डिसेंबर,२०१७
७) शासन निर्णय क्र एबावि-२०१८/प्र.क्र.७६/का.६ दिनांकः ११ ऑक्टोबर-२०१८

महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे परिशीष्ट -२ मधील तरतूदीनूसार व संदर्भीय शासन निर्णय क्रं १ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्हा वार्षिक योजना २०१७-१८ मधील प्राप्त तरतूदीमधून सदर्भ क्र.७ अन्वये प्रति अंगणवाडी ८.५० लक्ष प्रमाणे खालील अंगणवाडी इमारत बांधकामास याव्दारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | प्रकल्पाचे नाव | अंगणवाडी कैंद्राचे नाव व क्रमांक | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | लातूर | सेलू (बू) क्र.२ | ८,५०,०००/- |
| २ | | सलगरा बू क्र.१ | ८,५०,०००/ |
| ३ | | बोपला क्र.२ | ८,५०,०००/ |
| ४ | | बोरगांव(बू) क्र.४ | ८,५०,०००/ |
| ५ | | आर्वी क्र.६ | ८,५०,०००/ |
| ६ | चाकूर | कैंद्रेवाडी | ८,५०,०००/ |
| ७ | रेणापूर | भंडारवाडी क्र.१ | ८,५०,०००/ |
| ८ | | यशवंतवाडी | ८,५०,०००/ |
| ९ | औसा | हासेगांव तांडा | ८,५०,०००/ |
| १० | उदगीर | कुमदाळ (हेर) | ८,५०,०००/ |
| ११ | | शंभूउमरगा(महादेववाडी) | ८,५०,०००/ |
| १२ | जळकोट | करंजी क्र.२ | ८,५०,०००/ |
| १३ | शिरुर (अं) | अजनी(बू) क्र.२ | ८,५०,०००/ |
| १४ | देवणी | टाकळी (व) क्र.१ | ८,५०,०००/ |
| १५ | अहमदपूर | व्होटाळा(विळेगाव) | ८,५०,०००/ |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | | मुळकी(फत्तेपूर) | ८,५०,०००/ |
| १७ | निलंगा | वाडीशेडोळ | ८,५०,०००/ |
| १८ | | बसूपर क्र.२ | ८,५०,०००/ |

**नियम व अटी :-**

१. सदरील कामासाठीयेणाराखर्च-२२३६१३४६ अंगणवाडी इमारत बांधकामासाठी योजनांतर्गत अनुदान या लेखाशिर्षाखालीभागवावा.

२. सदर कामाची सुरुवात सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून सुरु होत आहे.

३. प्रस्तावित कामाचे वर्षनिहाय खर्चाचे नियोजन पुढील प्रमाणे राहील.

| आर्थिक वर्ष | अपेक्षित खर्च | सुरु असलेल्या इतर कामासाठी आवश्यक तरतुद | एकुण मंजुर तरतुद |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| सन २०१७-१८ | १,५३,००,०००/- | निरंक | ४४७.०० लक्ष |

४. सुरु असलेल्या कामाच्या वित्तीय नियोजनाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ क्र | कामाचे नाव | एकुण अपेक्षित खर्च | मागिल वर्षाअखेर झालेला खर्च सन २०१७-१८ | चालु वर्षात अपेक्षित खर्च | पुढील वर्षासाठीCarry Forward करावयाची तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| 1 | अंगणवाडी इमारत बांधकामे. | १,५३,००,०००/- | -- | २,२३,५०,००० | -- |

५. सदरील अंगणवाडी इमारतीचे बांधकाम अंगणवाडीतील बालकांना येण्या-जाण्यासाठी सोईस्कर होईलअशा ठिकाणी तसेच अंगणवाडी भरत असलेल्या सध्याच्या ठिकाणाजवळ असल्याची खात्री करूनचबांधकाम हाती घ्यावे. बांधकामाचे मार्कआऊट देतांना संबंधीत अंगणवाडी पर्यवेक्षिका, अंगणवाडीकार्यकर्ती यांच्या सहमतीने जागा ठरवून मार्कआऊट द्यावे.

६. मंजूर अंगणवाडीचे बांधकामाची ई-निविदा प्रक्रिया संबधीत ग्रामपंचायतीने एक महिण्याच्या आत पूर्ण करावी.अन्यथा सदरील मंजूर काम रद्द केले जाईल.

७.अंगणवाडीसाठी खुली जागा संबंधीत ग्राम पंचायतीने उपलब्ध करून द्यावी.जागा निश्चीत करतांना गट विकास अधिकारी,बाल विकास प्रकल्प अधिकारी व सरपंच यांचेशी संपर्क साधूनच काम सुरू करावे. सदरील काम यापुर्वी कुठल्याही निधीतून झाले नसल्याची खात्री करावी. **दि.३१.०३.२०१९** पर्यंत संबंधीत ग्राम पंचायतीने अंगणवाडी इमारत बांधकाम पूर्ण करावे अन्यथा सदर गावातील इमारतीची प्रशासकीय मान्यता तात्काळ रद्द करण्यात येईल.

८. मंजूर अंदाजपत्रक व शासनाचे संदर्भ क्रं.(४) अन्वये विहीत केलेल्या नमुना अंदाजपत्रकाप्रमाणे काम केलेजाईल याची दक्षता घ्यावी. अंदाजपत्रकामध्ये फळा, बेबी टॉयलेट व स्वयंपाक घराची तरतूदअसावी.तसेच आतील भींतीवर बोलकी अंगणवाडीच्या बाबी (उदा.पुर्व शालेय शिक्षण, अक्षरओळख, पक्षी/फळेओळख)आदी बाबी पेंट कराव्यात व याची तरतूद अंदाजपत्रकामध्ये करावी.

९. संदर्भ क्रं. ४ नुसार अंगणवाडी इमारत बांधकामाचे नियंत्रण व कामात सुसूत्रता रहावी यासाठी प्रत्येकटप्प्यावर(बांधकामाचा निर्णय घेवून त्याबाबतचे अंतिम देयक अदाई करेपर्यंत) कार्यवाही करतानानियंत्रणअधिकारीम्हणून उप मुख्य कार्यकारी अधिकारी(बाक) यांची मान्यता घेणे बंधनकारकराहील.

१०. काम पुर्ण झाल्यावर याची नोंद ग्राम पंचायतीच्या(मालमत्ता नोंद वही)मध्ये नोंदघेण्यात यावीसदरचेबांधकाम सहा महिन्यात पूर्ण करण्यात यावे.

११. अंतीम देयकासोबत अंगणवाडी इमारतीचा फोटो जोडावा. इमारतीवर गावाचे नाव, कोणत्या योजनेतून बांधकाम केले आहे, बांधकामाचे वर्ष नमुद करावे व या बाबी फोटोमध्ये याव्यात. या बाबीच्या पडताळणीसाठी अंतीम देयक उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) यांचे मार्फत सादर करावे.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) यांनी कार्यकारी अभियंता (बां.)यांचेकडून अंतीम देयक प्राप्तझाल्यानंतर एक दिवसात याची पडताळणी करून व त्यांचेकडील नोंदवहीत नोंद घेवून देयक वित्त विभागासपाठवावे.

१२. इमारत बांधकाम पुर्ण होताच संबंधीत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या ताब्यात द्यावी.

१३. सदरील मान्यता जिल्हा वार्षिक योजना-सन २०१७-१८ मध्ये प्राप्त होणा-या निधीच्या आधिन राहून देण्यातयेत आहे. सदरील कामासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे सर्व नियम लागू रहातील.

१४. सदरील कामाची कार्यान्वयीन यंत्रणा संबंधीत ग्राम पंचायत राहील.सदरील कामे गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे मार्फत करण्यात यावीत.व सदरील कामांची ई-निविदा प्रक्रिया संबंधित ग्रामपंचायत मार्फत करून घेवुन कामे पुर्ण करुन घ्यावीत.

१५. काम पुर्ण करून घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता(बांधकाम) जिल्हा परिषद, लातूर यांचीराहील.जर यंत्रणेनी कामाचा वेग/दर्जा समाधानकारक न ठेवल्यास संबंधीतावर कडक कार्यवाहीव्हावी.

**स्थळ प्रत मा.मु.का.अ.यांचे स्वाक्षरीत**

**स्वाक्षरीत**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,लातूर**

प्रत मा. जिल्हाधिकारी, लातूर यांना माहितीस्तव सादर.

प्रत मा. अध्यक्ष / उपाध्यक्ष/ सभापती सर्व विषय समिती, जि.प. लातूर.

**प्रत माहितीस्त व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर.
२) कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, लातूर.
३) गट विकास अधिकारी,पंचायत समिती----------------,जि. लातूर.
४) उपविभागीय अंभियता(बां) जि.प.उप विभाग---------
४) बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, ------------ जि. लातुर.
५) सरपंच/ग्रामसेवक, ग्राम पंचायत, --------------- ता.------------- जि. लातूर.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,लातूर करीता**